पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. ४/१०/२०१०

**पुणे महानगरपालिका –सुचना कार्यपत्रिका क्रं. ८ (पुरवणी)**
**ऑक्टोबर २०१०**

**गुरुवार, दि. ७ ऑक्टोबर २०१० या दिवशी दुपारी ४:०० (चार) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावाची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आली आहे.**

**:– मा.सभासदांचे प्रस्ताव –:**

विषय क्रं. २९१

संदर्भ :– **मा. आबा बागुल, विरोधी पक्षनेते व मा. अरविंद शिंदे, अध्यक्ष, स्थायी समिती यांची सुचना दि. २४/९/२०१०.**

१) मुख्य सभा ठराव क्र. ४९२, दिनांक २२/२/२०१०.

---

वॉर्ड क्र. ११६ स. नं. ४३ पर्वती येथे नव्याने बांधण्यात आलेल्या कला संकुलास भारतरत्न स्वर भास्कर पंडित भिमसेन जोशी कला संकुल असे नाव देवून त्याचे उद्घाटन भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या शुभहस्ते करण्यात यावे असा ठराव मंजूर झालेला आहे.

सदर कला दालनाचे उद्घाटन भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे ऐवजी भारताच्या राष्ट्रपती महामहिम सौ. प्रतिभाताई पाटील यांचे शुभहस्ते करण्यात यावा असा बदल करणेत यावा.

विषय क्रं. २९२

संदर्भ :– **मा. सौ. रेखा टिंगरे यांची सुचना दि. २९/९/२०१०.**

---

वॉर्ड क्र. १ धानोरी मध्ये धानोरी गावठाण याठिकाणी नव्याने बांधण्यात आलेल्या कै. काळूराम गोविंद टिंगरे व्यायाम शाळेचे उद्घाटन मा. ना. अजितदादा पवार, जलसंपदा व पालकमंत्री पुणे जिल्हा यांचे शुभहस्ते तसेच स्थानिक आमदार, मा. महापौर, मा. उपमहापौर व पुणे मनपाचे पदाधिकारी व स्थानिक नगरसेवक यांच्या उपस्थितीत करण्यात यावा व कार्यक्रमाचे सर्व अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दि. ४/१०/२०१०**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**